# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com
फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा. क्र./पमपा/आस्था / ०८ /२०२० दिनांक : ०२ /०१/२०२०

### थेट मुलाखत (Walk in Interview)

पनवेल महानगरपालिके अंतर्गत मालमत्ता कर विभागामध्ये विवक्षित कामकाजाकरिता इतर महानगरपालिका/ नगरपारिषद/नगरपालिकेमधून सेवानिवृत्त कनिष्ठ/वरिष्ठ लिपीक यांची, महापालिका अधिनियम १९४९ कलम ५३ मधील तरतुदीनुसार तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर व ठोक वेतनावर खालील अटी व शर्ती नुसार सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक १७/०१/२०२० रोजी थेट मुलाखत (Walk in Interview) आयोजित केलेली आहे. इच्छुक उमेदवारांनी दिनांक १७/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे आपली मुळ कागदपत्रे, सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे घेऊन स्वत: हजर राहावे. सविस्तर जाहिरात महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | सेवानिवृत्त कर्मचारी वर्ग-३ | कर्मचाऱ्यांची संख्या | विवक्षित कामे | अनुभव | शैक्षणिक अर्हता व वय | ठोक वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | महानगरपालिका / नगर परिषद / नगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त कनिष्ठ/वरिष्ठ लिपीक | १५ | महानगरपालिका अधिनस्त मालमत्ता सर्वेक्षण, कर आकारणी, कर संकलन,कर निर्धारण, कर वसुली विभागातील लिपीक कामकाज इत्यादी | महानगरपालिका / नगर परिषद / नगरपालिकेमध्ये कर विभागात काम केल्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव | १) शासनाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता. १२ वी/पदवी आणि मराठी/इंग्रजी टंकलेखन अनुक्रमे ३० व४०प्र.श.मि. शासन प्रमाणपत्र २) दि.३१/०७/२०१८ अखेर वय वर्षे ६५ पेक्षा जास्त नसावे. | रु. २०,०००/- |

**अटी व शर्ती :-**

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

७) सेवानिवृत्त कनिष्ठ लिपिक / वरिष्ठ लिपीक कर्मचाऱ्यांची सेवा ही प्रथम सहा महिन्याच्या मर्यादेकरीता राहील. तथापी नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या करार पध्दतीमधील कामकाजाचे दर सहा महिन्यांनी मुल्यमापन करण्यात येईल. कामकाज उत्कृष्ठ असल्यावरच त्यांना पुढे मुदत वाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

(जमीर लेंगरेकर)
उप आयुक्त I(मुख्यालय)
O/C पनवेल महानगरपालिका

2/1/2020
2/1/2020.